**<u>ठळक बातम्या</u>**

- संसदेचं हिवाळी अधिवेशन १ डिसेंबरपासून सुरू होणार

- स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत प्रमुख प्रचारकांची संख्या दुप्पट

- राज्यातल्या सर्व जमीन व्यवहारांची श्वेतपत्रिका काढून हिवाळी अधिवेशनात चर्चा करण्याची काँग्रेसची मागणी

आणि

- भारतानं ऑस्ट्रेलियाविरुद्धची टी-ट्वेंटी मालिका २-१ नं जिंकली

**<><><><>**

संसदेचं हिवाळी अधिवेशन येत्या १ डिसेंबरपासून सुरू होणार आहे. संसदीय कार्यमंत्री किरेन रिजिजू यांनी समाजमाध्यमावरच्या पोस्टद्वारे ही माहिती दिली. १९ डिसेंबरपर्यंत चालणाऱ्या या अधिवेशनात लोकशाही बळकट करणं आणि सामान्य नागरिकांच्या आकांक्षा पूर्ण करण्याच्या दृष्टीनं सकारात्मक चर्चा व्हावी, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली आहे. उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन यांनी पदाची सूत्रं स्वीकारल्यानंतर राज्यसभेचे पदसिद्ध अध्यक्ष म्हणून त्यांचं हे पहिलंच अधिवेशन असणार आहे. त्यांनी १२ सप्टेंबर रोजी उपराष्ट्रपतीपदाची शपथ घेतली होती.

**<><><><>**

न्यायाची भाषा ही सामान्य नागरिकांना सहज समजण्याइतकी सोपी असावी, असं मत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज व्यक्त केलं. नवी दिल्लीत सर्वोच्च न्यायालयात कायदेशीर मदत पोचवण्याची प्रक्रिया बळकट करण्याविषयीच्या राष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. न्यायदानाची प्रक्रिया सोपी करण्यासाठी सरकार वचनबद्ध असल्याची ग्वाही त्यांनी दिली.

***होल्ड… बाईट- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी***

गेल्या तीन वर्षांत सरकारच्या सहाय्यानं लोक अदालत आणि खटला दाखल होण्यापूर्वीच मध्यस्ती करून कायदेशीर सहाय्य यंत्रणांनी आठ लाखापेक्षा जास्त प्रकरणं

सोडवल्याचा उल्लेख प्रधानमंत्र्यांनी केला. सामान्य नागरिकांमध्ये कायदेशीर प्रक्रियांबद्दल जागृती वाढवणं आणि न्यायप्रक्रियेच्या बळकटीकरणासाठी त्यात तंत्रज्ञानाचा अंतर्भाव करणं याची गरज त्यांनी अधोरेखित केली.

न्यायालयीन सहाय्य म्हणजे देशबांधणीत योगदान देणं आहे, असं प्रतिपादन सरन्यायाधीश न्यायमूर्ती भूषण गवई यांनी केलं. लोकांच्या जीवनात परिवर्तन आणण्याचं डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचं स्वप्न साकार करणं हेच न्यायालयीन सहाय्य चळवळीचं ध्येय असल्याचं ते म्हणाले.

तर, तरुणांनी न्यायदानाकडे फक्त एक औपचारिक जबाबदारी म्हणून नाही, तर एक नागरिक-केंद्रित सेवा म्हणून बघावं, असं आवाहन कायदा आणि न्यायमंत्री अर्जुन राम मेघवाल यांनी केलं.

<><><><>

स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीच्या प्रचारासाठी राजकीय पक्षांच्या प्रमुख प्रचारकांची संख्या २० वरून वाढवून ४० करण्यात आली आहे. अनेक दिवसांपासून विविध पक्षांकडून ही मागणी होत होती. राजकीय पक्षांना प्रमुख प्रचारकांची यादी संबंधित जिल्हाधिकारी किंवा महानगरपालिका आयुक्त यांच्याकडे सादर करावी लागेल.

<><><><>

निवडणूक आयोगानं जाहीर केलेल्या कार्यक्रमानुसार पुणे, नागपूर आणि औरंगाबाद विभागातले पदवीधर मतदारसंघ, तसंच पुणे आणि अमरावती विभागातल्या शिक्षक मतदारसंघांच्या द्विवार्षिक निवडणुकांसाठीच्या मतदार याद्या नव्यानं तयार करायची प्रक्रिया सुरू आहे. यासाठी नागरिकांना mahaelection.gov.in/Citizen/Login या संकेतस्थळावर जाऊन अर्ज भरता येतील. २५ नोव्हेंबर रोजी प्रारूप मतदार याद्या प्रसिद्ध झाल्यानंतर नागरिकांना १० सप्टेंबरपर्यंत त्यावर दावे आणि हरकती सादर करता येतील. अंतिम मतदार याद्या ३० डिसेंबर रोजी प्रसिद्ध होणार आहेत.

<><><><>

कोल्हापूरमधे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका महाविकास आघाडी म्हणूनच लढणार असल्याचं आघाडीच्या नेत्यांनी जाहीर केलं. कोल्हापूरमधे काल

महाविकास आघाडीची बैठक झाली, त्यावेळी हा निर्णय झाला. काँग्रेस नेते सतेज पाटील, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते विनायक राऊत आणि सुनील प्रभू, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे व्ही बी पाटील यावेळी उपस्थित होते. स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते राजु शेट्टी यांच्याशीही लवकरच चर्चा करणार असल्याचं सतेज पाटील यांनी सांगितलं.

<><><>

सिंधुदुर्ग जिल्ह्यात स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुक महायुती म्हणून लढण्यासाठी शिवसेना सकारात्मक आहे, मात्र युती झाली नाही शिवसेना स्वबळावर लढण्यासाठी तयार असल्याचं मंत्री उदय सामंत यांनी स्पष्ट केलं. ते आज सिंधुदुर्ग इथं पत्रकार परिषदेत बोलत होते. सिंधुदुर्गात नारायण राणे हे महायुतीचे नेते आहेत, त्यांच्या भूमिकेशी आपण सहमत आहोत असं सामंत म्हणाले. रत्नागिरी जिल्ह्यात महायुती म्हणून निवडणूक लढणार असल्याचं निश्चित झालं आहे, असंही सामंत यांनी सांगितलं.

<><><>

गडचिरोलीचा उल्लेख महाराष्ट्राचं प्रवेशद्वार म्हणून होण्यासाठी शेवटच्या गावापर्यंत विकास पोहोचवण्याकरता राज्यसरकार प्रयत्नशील आहे, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. मुख्यमंत्र्यांच्या हस्ते आज गडचिरोली जिल्ह्यात सिरोंचा इथं रुबी हॉस्पीटल, वेलनेस रुग्णालय आणि महाविद्यालय संकुलाचं उद्घाटन झालं, त्यावेळी ते बोलत होते. याशिवाय मुख्यमंत्र्यांच्या हस्ते अहेरीत महिला आणि बाल रुग्णालयाचंही लोकार्पण झालं. महात्मा फुले जनआरोग्य योजनेत आता २ हजार ४०० आजारांचा समावेश करण्यात आला असून, त्याचा फायदा गोरगरीब नागरिकांना होईल, दक्षिण गडचिरोलीत आरोग्य व्यवस्था मजबूत झाल्यानं जिल्ह्याच्या आरोग्य व्यवस्थेत आमुलाग्र परिवर्तन घडून येईल, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

<><><>

भारतीय राजस्व सेवेतल्या अधिकाऱ्यांचं अर्थव्यवस्थेमधलं योगदान महत्त्वाचं असून ज्या प्रमाणात महसूल संकलन होईल, तेवढ्या प्रमाणात लोककल्याणकारी योजनांसाठी निधी उपलब्ध होतो, असं केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी

म्हटलं आहे. केंद्रीय प्रत्यक्ष कर अकादमीच्या स्थापनादिनानिमित्त नागपूरमध्ये आयोजित कार्यक्रमात ते आज मुख्य अतिथी म्हणून बोलत होते.

**<><><><>**

मुंबई, पुण्यासह संपूर्ण राज्यभरात कोट्यवधी रुपयांचे भूखंड कवडीमोल भावाने लाटले जात असून या सर्व जमीन व्यवहाराची श्वेतपत्रिका काढावी आणि हिवाळी अधिवेशनात त्यावर चर्चा करावी अशी मागणी, काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केली. मुंबईत टिळक भवन इथं ते आज वार्ताहर परिषदेत बोलत होते. पुण्यात कोरेगाव पार्क इथल्या जमीन व्यवहारावरून त्यांनी सरकारवर टीका केली. हा गैरव्यवहार उघड झाल्यावर तो रद्द करण्यात आला, मात्र दोषींवर काहीही कारवाई केली नाही अशी टीका सपकाळ यांनी केली.

**<><><><>**

मराठा आरक्षण आंदोलनकर्ते मनोज जरांगे पाटील आणि इतर पाच जणांना यांना मुंबई पोलिसांनी येत्या सोमवारी तपास अधिकाऱ्यांसमोर हजर होण्याचं समन्स बजावलं आहे. सप्टेंबर महिन्यात मुंबईच्या आझाद मैदानावर जरांगे यांनी केलेल्या उपोषणादरम्यान मुंबई उच्च न्यायालयानं घालून दिलेल्या दिशानिर्देशांचं उल्लंघन झाल्याचा पोलिसांचा आरोप आहे. त्यासंदर्भात हे समन्स बजावण्यात आलं आहे.

**<><><><>**

नवी मुंबई पोलिसांच्या गुन्हे शाखेनं सायबर फसवणुक करणा-या १२ जणांच्या टोळीला अटक केली आहे. ऑनलाईन गेमिंगद्वारे फसवणूक करणाऱ्या या टोळीनं आतापर्यंत सुमारे ८४ कोटी रूपयांची फसवणूक केल्याचं उघड झालं आहे. यासाठी या टोळीनं देशभरातल्या विविध बँकांची तब्बल ८८६ खाती वापरली होती. पोलिसांच्या कारवाईत ५२ मोबाईल फोन, ७ लॅपटॉप, ९९ डेबिट कार्ड, ६४ पासबुकं आणि एक चारचाकी असा १८ लाख रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

**<><><><>**

सिंधुदुर्ग जिल्ह्यात कुडाळ एमआयडीसीत वर्षानुवर्षे भूखंड पडीक ठेवत त्यावर उद्योग न उभारलेल्या भूखंडधारकांना कारणे दाखवा नोटीस बजावण्याचे आदेश उद्योगमंत्री उदय सामंत यांनी दिलेत. कुडाळ एमआयडीसी इंडस्टीज असोसिएशनतर्फे बॅ नाथ पै

शिक्षण संस्थेच्या सभागृहात उद्योगमंत्री उदय सामंत यांचा आज सत्कार करण्यात आला. त्यावेळी झालेल्या कार्यक्रमात ते बोलत होते.

**<><><><>**

महिला आणि बालविकास क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या महिलांना महाराष्ट्र सरकारतर्फे दरवर्षी पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर पुरस्कार दिला जातो. अलिकडेच २०२०-२१, २०२१-२२ आणि २०२२-२३ या तीन वर्षांचे पुरस्कार जाहीर झाले. जाहीर झालेल्या पुरस्कारांत चंद्रपूर जिल्ह्यातल्या नीता पंत्त, जागृती फाटक आणि ॲडव्होकेट क्षमा बासरकर-धर्मापुरीवार यांचा समावेश आहे. तसंच अहिल्यानगर जिल्ह्यातल्या कोपरगावच्या गोकुळचंदजी विद्यालय प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका संगीता मालकर आणि सवित्रा गायकवाड यांनाही पुरस्कार जाहीर झाला आहे.

**<><><><>**

कोल्हापूरच्या अंबाबाईच्या दक्षिणायन किरणोत्सवास प्रारंभ झाला. आज मावळत्या सूर्य किरणांनी प्रारंभी देवीच्या चरणांना स्पर्श केला त्यानंतर संध्याकाळी पाच वाजून ४७ मिनिटांनी ही किरणं देवीच्या खांद्यावर पडून लुप्त झाली. हा किरणोत्सव पाहण्यासाठी भाविक पर्यटकांची मोठी गर्दी झाली होती.

**<><><><>**

भारत आणि ऑस्ट्रेलिया दरम्यानचा टी ट्वेंटी क्रिकेट सामना आज पावसामुळे रद्द झाला, आणि मालिका भारताने २ विरुद्ध १ अशी जिंकल्याचं जाहीर करण्यात आलं. ब्रिस्बेनच्या गब्बा स्टेडीयमवर आज सामना सुरु झाला तेव्हा ऑस्ट्रेलियाने नाणेफेक जिंकून भारताला फलंदाजीसाठी आमंत्रित केलं. भारताच्या नाबाद ५२ धावा झाल्या असतानाच पावसामुळे खेळ थांबला. अभिषेक शर्मा मालिकावीर ठरला.

**//<><><><>//**